# प्रकरण १ ले - प्रास्तविक

१.१ प्रस्तावना.

१.२ संशोधन अभ्यासाची गरज.

१.३ संशोधन अभ्यासाचे महत्व.

१.४ संशोधन समस्येचे शिर्षक.

१.५ काही संज्ञाना व्याख्या.

१.६ संशोधनाची उद्दिष्टे.

१.७ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा.

१.८ दक्षिण सोलापूर तालुक्याची माहिती.

# प्रकरण १ ले - प्रास्तविक

## १.१ प्रस्तावना

अंगणवाडी शिक्षण हे शिक्षण क्षेत्रातील अतिशय उपेक्षित असे क्षेत्र आहे. या स्तरावरील शिक्षण विकासाच्या आड अनेक समस्या येताना दिसत आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अंगणवाडी शिक्षणाला अधिक चालना मिळणे आवश्यक होते. कारण प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकरणासाठी ज्या अनेक योजना कार्यवाहित आणल्या जात आहेत. त्यापैकीच अंगणवाडी हे एक आहे.

प्रत्येक व्यक्तिच्या आयुष्यातलि पहिली पाच - सहा वर्षे अतिशय महत्वाची असतात. या वयातील मुलांवर जे - जे संस्कार केले जातात, त्या सर्वांचा परिणाम त्यांच्या आयुष्यावर फार दूरगामी होत असतो. या वयाला 'संस्कारक्षम काल' असे मानले जाते म्हणून या संस्कारासाठी अंगणवाडी शिक्षणाची अत्यांत गरज आहे. समाजालाही या शिक्षणाचे दिवसेंदिवस महत्व जाणवू लागले आहे. कारण या वयातील मुलांचा शारीरिक, मानसिक व भावनिक विकास योग्य प्रकारे झाला पाहिजे हे पालकांनाही समजू लागले आहे. त्यामुळेच आज अंगणवाडी शाळांना शहरी विभाग व थोडयाफार प्रमाणात ग्रामीण विभागात देखील लोकप्रियता लाभत आहे.

अंगणवाडी शिक्षण म्हणजे प्राथमिक शिक्षणाची सुरुवात होण्यापूर्वी बालकांना दिले जाणारे शिक्षण असे सर्वसाधारणपणे म्हणता येईल. "प्राथमिक शिक्षणाच्या प्रारंभापूर्वी सुमारे ३ ते ५ या वयात जे शिक्षण दिले जाते ते अंगणवाडी शिक्षण होय" अंगणवाडी शिक्षण हा सर्व शिक्षणाचा पाया आहे या वयातच व्यक्तिविकासाचा पाया घातला जातो. म्हणून या वयात व्यक्तिविकास योग्य दिशेने झाला नाही तर या काळात निर्माण झालेल्या विकृती भविष्य

काळात दुरुस्त होणे कठिण आहे. व्यक्तिच्या सर्वांगिण विकासाची मुहूर्तमेढ बालकाच्या संस्कारक्षम वयातच रोवावयास पाहिजे.

सेंट्रल अॅडव्हासरी बोर्ड आफ एज्युकेशनने १९४४ साली त्या वेळेचे हिन्दुस्थान सरकारने शैक्षणिक सल्लागार सर जान सार्जंट यांना युध्दोत्तर काळातील शैक्षणिक योजना आखण्याची कामगिरी सांगितली होती. त्यांची ही योजना १९४४ सालीच प्रसिध्द करण्यात आली. या योजनेत पूर्वप्राथमिक शिक्षणाचा उल्लेख प्रथमच करण्यात आला. राष्ट्रच्या शैक्षणिक व्यवस्थेत पूर्वप्राथमिक शिक्षण एक महत्वाचे अंग असून या शिक्षणासाठी पुरेशी तरतूद करणे आवश्यक आहे. या अहवालामुळेच स्वातंत्र्योत्तर काळात पूर्वप्राथमिक शिक्षणाला शहरी तसेच तुरळक ग्रामीण भागात महत्व प्राप्त होत आहे.

"अंगणवाडी शिक्षणाच्या संदर्भात कोठारी शिक्षण आयोगो (१९६४ - ६६) या शिक्षणाची उद्दिष्टे व महत्व यांचा निर्देश केला आहे. देशातील अंगणवाडी शिक्षणाची सद्यःस्थिती अपुरी असून त्यात वाढ होणे आवश्यक आहे. या अहवालात 'पूर्वप्राथमिक शिक्षणाची उद्दिष्टे' पुढील प्रमाणे."[१]

१) बालकांच्या ठिकाणी चांगल्या आरोग्यविषयक सवयी विकसित करुन पोशाख करणे, स्वच्छता राखणे इत्यादी वैयक्तिक समायोजनासाठी आवश्यक असणारी कौशल्ये वाढील लावणे.

२) वांछित सामजिक वृत्ती आणि चालीरीत विकसित करुन बालकांना इतराचे हक्क व अधिकार याबाबत संवेदनशील बनविणे व याद्वारे त्याला निरामय सामाजिक सहभागात प्रोत्साहित करणे.

३) बालकास स्वतःच्या भावना व संवेदना यांचे योग्य आकलन अविष्कारण आणि नियंत्रण करण्यात मार्गदर्शन करुन त्यांची

---

१) लीला पाटील, विश्वंभर कुलकर्णी - "आजचे शिक्षण आजच्या समस्या" पुणे विद्या प्रकाशन, द्वितीय आवृत्ती - १९७४ पान नं. १४.

भावनिक परिपक्वता विकसित करणे.

४) सौंदर्यपूर्ण रसग्रहणात उत्तेजन देणे.

५) परिस्थिती बद्दलचे बौध्दिक औत्सुक्य जागृत करुन सभोवतालच्या जगाचे आकलन होण्यास मदत करणे.

६) बालकांना स्व - अविष्कारणासाठी भरपूर संधी देवून स्वातंत्र्य आणि सर्जनशीलता प्रोतहित करणे.

७) स्वतःचे विचार आणि भावना योग्य आणि स्पष्ट भाषेत मांडण्याची क्षमता विकसित करणे.

८) बालकांचया ठिकाणी सुदृढ शरीर, पुरेसे स्नायविक संयोजन आणि मूलभूत स्नायविक कौशल्ये यांचा विकास करणे.

आपल्या देशात जवळ - जवळ चाळीस टक्के मृत्यु पाच वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांमधील आढळून आलेले आहेत. याचाच अर्थ असा की, या वयोगटातील मुलांकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. ० ते ५ वयोगटातच मुलांची शारीरीक व मानसिक वाढ पूर्ण होते. या काळात त्याला पौष्टिक आहार मिळाल्यास काही रोगांपासून तर बचाव होतोच शिवाय त्याच्या पुढील विकासास मदत होते. तसेच मुल उत्सही व शिकण्याची मनोवृत्ती त्यांच्यात निर्माण होते. म्हणून भारत सरकारने एकात्मिक बालविकास अंगणवाडी शिक्षणाचा विचार करण्यासाठी नेमलेल्या अभ्यासगटाने वरील परिस्थितीची जाण ठेवून अंगणवाडी शिक्षणाची पुढील प्रमाणे उद्दिष्टे सांगितली आहेत.

१) मुलांमधील रोगांचे आणि मृत्युचे प्रमाण घटवण्याकरीता आणि संसर्गजन्य रोगांपासून त्याचे संरक्षण करण्यासाठी ठराविक दिवसांनी वैद्यकीय तपासणी करुन बालकांचे आरोग्य चांगले राखणे.

२) मुलांच्या उपजत शारीरिक आणि मानसिक क्षमतांचा पूर्ण विकास व्हावा म्हणून त्यांच्या संस्कारक्षम वयात त्यांना सकस आहार उपलब्ध करुन देणे.

३) बालकांच्या समाजिक आणि भावनिक समतोल विकास होण्यासाठी योग्य वातावरणाची निर्मिती करणे.

४) ज्ञानग्रहण करण्याची कुवत वाढविण्याच्या उद्देशाने योग्य वातावरणाची निर्मिती करणे.

५) मुलांचे योग्य वृत्ती, मूल्ये आणि वर्तणूक यांची जोपासना व्हावी म्हणून सुरक्षित स्नेहयुक्त वातावरणाची योजना करणे.

६) बालकांच्या गरजा आणि समाजाची त्याबाबतची जबाबदारी याबद्दल लोकमानस जागृत करणे.

वर सांगितलेल्या उद्दिष्टांचा विचार केल्यास अंगणवाडी शिक्षणाबाबत आपल्याला अजून किती वाटचाल करावयाची आहे. हे समजू शकेल, म्हणून अंगणवाडी शिक्षणात आजच्या काळात संशोधन करण्याची फारच गरज आहे.

एरीकसन नावाच्या मानसशास्त्रज्ञाने बालकांच्या मानसिक विकासाच्या अवस्थाबद्दल लिहिताना म्हटले आहे की "मूल प्राथमिक शाळेत जाण्यापूर्वी त्याला योग्य मार्गदर्शन व 'शिक्षण मिळाल्यास त्याच्या ठिकाणी स्वयंप्रेरणा, आत्मविश्वास व स्वतंत्र वृत्ती यांचा विकास होऊन ते प्रेमळ बनते आणि त्याच्या ठिकाणी निर्णयशक्ती येते. तसेच दिल्या गेलेल्या शिक्षणामुळे त्याला कार्यप्रवृत्त करणे सुलभ असते आणि त्याच्या ठिकाणी देखील इतरांना कार्यप्रवृत्त करण्याची क्षमता निर्माण होते."

वरील चर्चेवरुन आपल्या लक्षात येईल की, अंगणवाडी शिक्षणाच्या कालावधीत भाषा शिक्षण, आरोग्य शिक्षण, अहारविषय शिक्षण, इंद्रिय शिक्षण, स्नायु शिक्षण व मानवी जीवन मूल्ये शिक्षण यांचा समावेश होतो. या

शिक्षणाद्वारे मुलांच्या भावी शिक्षणाची तयारी केली जाते. मुलाला त्यांच्या सभोवतालच्या सृष्टीचा परिचय करून देणे, मानवी संस्कृती आत्मसात करण्यात त्याला मदत करणे तसेच आत्मिक विकासाबरोबर त्याचा सामाजिक विकासही घडला पाहिजे यासाठी प्रयत्नशील राहणे. या गोष्टी अत्यंत महत्वाच्या आहेत. म्हणून या शिक्षणाच्या कक्षेत या सर्वांचा समावेश केला जातो. म्हणून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये बालकांच्या विकासावर फार भर दिला आहे. बालकाच्या विकासाचे स्वरूप लक्षात घेवून पोषण, आरोग्य, शारीरिक - मानसिक, सामाजिक, भावनिक व नैतिक इत्यादी विकासाच्या बाबतीत बालसंगोपन व बालशिक्षण यांना अग्रक्रम देण्यात आला आहे. तसेच प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकरणास पूरक म्हणून बालसंगोपन गृहे स्थापनणयात येणार आहेत.

## १.२ संशोधन अभ्यासाची गरज

संशोधकाचा मोठया भावाच्या मुलगा अंगणवाडी शाळेत १००१ ते २००२ या काळात शिक्षण घेत होता त्यानिमित्ताने त्याला शाळेत पोहचविणेसाठी व आणण्यासाठी शाळेत जावे लागत होते. सोलापूर जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणी व ग्रामीण भागात असणा-या अंगणवाडया शाळेच्या व त्या शिक्षणाच्या कोणकोणत्या समस्या आहेत. तसेच सोालपूर जिल्ह्यातील अंगणवाडी शिक्षणावर व शाळेच्या समस्यावर आजपर्यंत कोणतेही संशोधन झालेले नाही. म्हणून संशोधकाने मुद्दाम या समस्येची निवड केलेली आहे.

समस्याचा अभ्यास करताना अंगणवाडी शिक्षणात शालेय परिसर हा अत्यंत महत्वाच घटक असूनही ब-याच शाळेतील शालेय परिसर योग्य असल्याचा दिसून येत नाही. बालशिक्षणात योग्य असा परिसर निर्माण करून बालकास हवे असे शिक्षण दिले जात नाही असे दिसुन आले आहे. संशोधकास आजच्या

या शाळेमध्ये बालकाच्या विकासपेक्षा घडणीवर व स्वातंत्र्यापेक्षा बंधनावर अधिक भर दिला जात आहे. असे दिसून आले आहे. अंगणवाडी शिक्षणात इंद्रिय शिक्षण व स्नायु शिक्षण अतिशय महत्वाचे असूनसुध्दा शाळेमध्ये क्रिडांगणा अभावी व साहित्याअभावी या दोन्ही प्रकारचे शिक्षण व्यवस्थित मिळत नाही. असे नजरेत आले आहे.

पालक शिक्षक संघाच्या सभेवरून संशोधकास असे दिसुन आले की समाजातील पालकांना या शिक्षणाचे हवे तितके महत्व आज वाटत नाही. शाळेत पाठविणे ही जबाबदारी म्हणून बरेचशे पालक मुलांना शाळेत पाठवित आसतात. आपल्या बालकांचा विकास कसा होत आहे, त्यांच्यावर कसे संस्कार होत आहेत, ते खेळण्याण्यात रमतात किंवा नाही याविषयी कधीही चौकशी करीत नाहीत. पालक शिक्षक संघाच्या सभेत आपल्या बालकाच्या अडचणीही सांगत नाहीत. त्यामुळे आजचा पालकवर्ग या शिक्षणाच्याबाबतीत फारसा विचार करणारा दिसून आला नाही. कित्येक पालक कधीही सभेला उपस्थित राहत नाहीत. शिक्षकांनी निमंत्रण पाठविल्यावरही न भेटणारे पालक पहावयास मिळाले आहेत.

मुलांना या अवस्थेत अंगणवाडी शिक्षणाच्या काळत जे काही शिक्षण मिळणार आहे ते भावी आयुष्याच्या दृष्टीने अधिक महत्वाचे आहे. कारण या अवस्थेत बालकावर जे काही चांगले - वाईट संस्कार होतात ते चिरकाल टिकणारे असतात. या अवस्थेतील शिक्षण सर्व शिक्षणाचा पाया आहे. म्हणून या वयातच बालकांचा व्यक्तिविकास योग्य दिशेने झाला नाही तर या काळात निर्मान झालेल्या विकृती पुढे सुधारणे शक्य नसते म्हणून बालकांच्या शिक्षणाची सुरुवात चांगल्याप्रकारे झाली म्हणजे अधिकाधिक काम झाले असे मानण्यास हरकत नाही. कारण बालकास शिक्षणाची एकदा गोडी लागली की मग त्याचा सर्वांगिण विकास सुलभतेने होतो.

बालकाचा भविष्यकालीन सर्वांगिण विकास डोळयासमोर ठेवून त्यांना भाषा शिक्षण, इंद्रिय शिक्षण, स्नायु शिक्षण व चांगल्या सवयीसाठी योग्य शालेय परिसर, मोकळया जागेतील खेळण्याची साधने, हस्त व मुक्त व्यवसायाची साधने, मधल्या सुट्टीतील जेवण्याची व्यवस्था, वैद्यकीय तपासणी, प्रशिक्षित शिक्षिका शालेय प्रशासन, शालेय इमारत व शालेय व्यवस्थापन कसे आहे हे जाणून घेण्याची संशोधकाची इच्छा असल्यामुळेच या समस्येची निवड केली आहे.

## १.३ *संशोधन अभ्यासाचे महत्व*

भारतात पूर्वी एकत्र कुटुंब पध्दती प्रचलित होती. अशा एकत्र कुटुंब पध्दतीत मुलांना अंगणवाडी शिक्षण घरीच मिळत असे. घरातील आजी - आजोबा लहान मुलांचा सांभाळ करीत असत आजी - आजोबा या व्यक्ति त्यादृष्टीने फार महत्वाच्या होत्या. कारण लहान मुलांचा सांभाळ करुन त्यांना 'चिऊ - काऊ' पासून ते 'रामायण - महाभारत' यातील गोष्टी सांगून मातेच्या अनुभवपूर्ण भूमिकेतून बालकांचे लालन पालन होत असे. शैश्व अवस्थेमध्ये आवश्यक ते नैसर्गिक वातावरण आणि मातृतुल्य व पितृतुल्य वागणूक यामुळे एकत्र कुटुंब पध्दतीत अंगणवाडी शिक्षणात बरेचशे शिक्षण घरीच मिळत असे.

आज एकत्र कुटुंब पध्दती मागे पडू लागली आहे. पाश्चात्य देशामधील वारे भारतातही वाहू लागले आहेत. शहरामध्ये घरांची टंचाई भासू लागली आहे. कुटुंबातील म्हाता-याना टाळायची प्रवृत्ती तरुणांमध्ये रुढ होवू लागली आहे. त्यामुळे सध्या विभक्त कुटुंब पध्दतीमधील कृत्रीम वातावरणात मुलांची शारिरीक, भावनिक आणि बौध्दीक दृष्टया उपासमार होवू लागली आहे.

"आजच्या सामाजिक परिस्थितीत शहरामध्ये व खेडयामध्ये बालमंदिराची विशेष गरज अनेक कारणांनी भासत आहे. शहरामध्ये जागेची अडचण असते

त्यामुळे एका खोलीतच अनेक कुटुंबांना संसार करावा लागत आहे. उदा. मुंबई ७२.३ टक्के, कोलकत्ता ७१.९ टक्के व दिल्ली ६३ टक्के कुटुंब एका खोलीतच गुजराण करीत आहेत."[२] अशा परिस्थितीत मुलांना वाहनाच्या भितीमुळे रस्त्यावर खेळण्यास जाऊ देता येत नाही. घराच्या आजूबाजूला जवळ पास क्रिडांगण व बाग नसने. ज्या कुटुंबाच्या घराजवळ अशी योग्य सोई असतील तर तेथे मुलांना कोणी घेवून जावयाचे हा प्रश्न असतोच शेजारपाजारीही कित्येक वेळा योग्य प्रकारचा नसतो. त्यांच्या मुलांमध्ये आपली मुले मिसळली तर त्यांना वाईट सवई लागतील अशी भीती पालकांना असते म्हणून अशा स्थितीत मुलांना जर बालमंदिरात पाठविले तर एक मोठी अडचण दूर होईल यासाठी आजच्या काळात अंगणवाडी शाळांची फार मोठी गरज आहे.

आजच्या काळात पुर्वीसारखी एकत्र कुटुंब पध्दती शहरात तरी फारशी नाही. त्यामुळे घरी मुलांना वयाची इतर मुले खेळावयास मिळत नाहीत व मग ती मोठया माणसाभोवती घोटाळतात व त्यांचा मोठया माणसाना त्रास वाटतो. परंतु याला मुले तरी काय करणार? म्हणून मुलांना बालमंदिरात पाठविले तर त्यांना समवयस्क सोबती मिळतील. सध्याचे जीवन ओढाताणीचे झाल्यामुळे पुरषांच्या उत्पनाच्या जोडीला भर घालण्याची गरज असते व खर्च भागविण्यासाठी स्त्रियांनाही काम करावे लागते. असे दृष्य कित्येक मध्यमवर्गीय कुटुंबात दिसुन येते त्यामुळे आज बालमंदिराची गरज आहे.

ग्रामीण भागामध्ये झोपडपट्टी विभागात राहणा-या कुटुंबातील मुलांना योग्य वातावरण मिळत नाही. तसेच त्यांच्यावर योग्य संस्कार होत नाहीत म्हणून अशा

विभागातील मुलांसाठी समृध्द बालमंदिरांची आवश्यकता आहे. बालमंदिराचा परिणाम अशा कुटुंबावर अप्रत्यक्षपणे चांगलाच होत असतो. बालशिक्षण हे

२) "लोकसंख्या शिक्षण जाणीव पत्रिका"
पुणे : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण पुणे - ३०.

अशा वर्गाचे सांस्कृतिक शिक्षणही घडत असते. कारण मुले बालमंदिरातील संस्कार घरी घेवून येतात. आपल्या मुलांशी प्रेमाचा व्यवहार करणा-या व्यक्तिंचे म्हणजेच ऐकावे असेही पालकांना वाटते. म्हणून सामाजिक स्वच्छता, व्यक्तिगत स्वच्छता, आरोग्य ज्ञान यांचा प्रसार बालमंदिरानी अशा मागासलेल्या भागात करणे आवश्यक आहे. म्हणून ग्रामीण भागामधील मागासलेल्या भागात बालमंदिरांची अत्यंत गरज आहे.

आजच्या काळात ग्रामीण विभागामध्ये अंगवाडयांची गरज विशेष जाणवत आहे. परंतु या विभागातील लोकांना या शिक्षणाचे महत्व अदयाप पटलेले दिसून येत नाही. ग्रामीण भागात मुलांना घरी ठेवून स्त्री - पुरुष शेतावर कामाला जातात व घरी काम असताना मुलांना गावभर भटकण्याची मोकळीक ते देतात त्यामुळे मुलांचा हा काळ एकतर वायफट जातो. तसेच काही वेळा लहान भांवडांना सांभाळण्याचे काम मोठया मुलांना करावे लागते व त्यामुळे सक्तीचे प्राथमिक शिक्षण असूनही त्यांना शाळेत जाता येत नाही. म्हणून ग्रामीण भागात आज मोठया प्रमाणात अंगणवाडीची गरज आहे.

अंगणवाडी शिक्षणातून मुलांवर जे बरे - वाईट संस्कार होतात ते चिरकाल टिकतात. हे मानसशास्त्रीय दृष्टया सत्य आहे. यादृष्टीने हा कालखंड अतिशय महत्वाचा आहे. या कलखंडात अपेक्षित चांगल्या सवयी, प्रवृत्ती व संस्कार यांचा विकास व्हावयाचा असतो. या अवस्थेत जर मुलांच्या सर्वांगिण विकासाला पोषक वातावरण मिळाले नाही तर पुढील विकासाला सुयोग्य दिशा मिळणार नाही. म्हणून बालकांच्या मनावर सुस्कार होण्यासाठी शिक्षणाद्वारा घालवयाच्या भक्कम पायासाठी आणि शारिरीक, बौध्दीक व भावनिक समतोल विकास होण्यासाठी अंगणवाडी शिक्षण अतिशय महत्वाचे आहे.

व्यक्ति विकास व जीवनाची सफलता ही शिक्षणाची उद्दिष्टे मानली तर मुलांवर योग्य काळात योग्य संस्कार करणे किती आवश्यक आहे हे सहज समजू

शकेल. अंगणवाडी शिक्षण हा सर्व शिक्षणांचा पाया आहे. बालवयातच मुलांचा व्यक्तिविकास योग्य दिशेने झाला नाही तर या काळात निर्माण झालेल्या विकृतीपुढे दुरूस्त होणे अतिशय कठीण जाते. मुलांच्या शिक्षणाला दोन बाजू असतात. वैयक्तिक व सामाजिक त्यांचा विचार करता अंगणवाडी शिक्षण म्हणजेच जीवनाच्या तयारीची खरी सुरुवात होय. देशाची कोणतीही योजना यशस्वी करावयाची असेल तर सुसंस्कृत नागरीक एकदम तयार होत नाही तर तो घडवावा लागतो. व्यक्तिचा सर्वांगिण विकास हे शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे असे आपण आवर्जून सांगतो. व्यक्तिच्या सर्वांगिण विकासाची मुहुर्तमेढ बालकाच्या संस्कारक्षम्य वयातच रोववावी लागते. याबद्दल दुमत असल्याचे कारण नाही.

बालकांचे आरोग्य आणि आहार याबाबत बालवयात जर दुर्लक्ष झाले तर त्याच्या शिक्षणाची कुवत मंदावते असे वेधक शास्त्राने सिध्द केले आहे. बालवयात (० ते ५ वर्ष) योग्य आहार आणि आरोग्यविषयक चांगल्या सवयी लावल्या तर बुध्दीमत्तेची योग्य वाढ होण्यास मदत होईल. तसेच या अवस्थत बालकांना पोष्टीक आहार (जीवनसत्वयुक्त) मिळाल्यास कांही रोगापासून (मुडदुस, रातअंधळेपणा, स्कर्व्ह व कुपोषण) तर बचाव होतोच शिवाय त्यांच्या पुढील विकासात मदत होते. म्हणून बालशिक्षणाचे इतके महत्व असताना सुध्दा संशोधकास दक्षिण सोलापूर तालुक्याती ग्रामीण भागातील अंगणवाडी शाळेची पाहणी करताना ज्या अनेक समस्या नजरेत आल्या त्यामुळे या शाळेंच्या व शिक्षणाच्या समस्या कशा दुर करता येतील व तेथील अडचणी सोडवण्यात काय करता येईल? यासाठी संशोधकाने या समस्येची मुद्दाम निवड केली आहे.

संशोधकाच्या या संशोधनामुळे महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, जिल्हा परिषद, महानगर पालिका, नगरपालिका व खाजगी संस्था मार्फत चालविल्या जाणा-या अंगणवाडी शाळेमधील मुख्याध्यापिका, शिक्षिका, संचालक,

संस्थापक, शासकीय शैक्षणिक प्रशासन अधिकारी, पालक - शिक्षक संघाचे अध्यक्ष यांना मार्गदर्शन मिळावे तसेच सदयस्थितीतील उणिवा दूर करण्यास प्रेरणा मिळावी या उद्दिष्टाने संशोधकांने या समस्येची निवड केली आहे.

## १.४ *संशोधन समस्येचे शीर्षक*

"दक्षिण सोलापूर तालुक्यातील एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत अंणवाडयाच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास"

## १.५ *काही संज्ञाच्या व्याख्या*

१ दक्षिण सोलापूर तालुका

"सोलापूर जिल्हयातील अकरा तालुक्यापैकी एक तालुका"

२ अंगणवाडी

"ज्या ठिकाणी बालसंगोपन व पूर्व प्रथमिक शिक्षण दिले जाणार आहे अशा अंगणवाडया."

३ एकात्मिक बालविकास प्रकल्प

"औपचारीक शिक्षणापासून जे समाजातील अतिदुर्लक्षित सार आहेत त्यांच्यासाठी स्थापन केलेला प्रकल्प."

४ अंगणवाडी सेविका

"अंगणवाडी मध्ये बालसंगोपन व बालशिक्षण देण्याचे काम करणारी सेविका."

५ अंगणवाडी परिसर

"अंगणवाडी इमारत, अंगणवाडी आवार, स्वच्छतागृहे, क्रिडांगण, शालेय बाग, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था इत्यादी सुविधा असलेला परिसर."

६. अंगणवाडी शाळेतील व्यवस्थापन

"शाळा प्रमुखाची निवड , आर्थिक व्यवहार , शिक्षिकांची नेमणूक व शालेय संस्थेत वेळोवेळी योग्य तो बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने व्यवस्थापक मंडळाचे व शासकीय अधिका-यांनी केलेले कार्य म्हणजे व्यवस्थापन."

७. अंगणवाडी शालेय प्रशासन

"अंगणवाडी शाळेच्या दैनंदिन कामकाजावर नियंत्रण ठेवून शाळेच्या समस्या सोडवण्यासाठी शिक्षक पालक व व्यवस्थपक मंडळ यांच्याशी विचारविनिमय करून शाळा प्रमुखांनी केलेले योग्य कार्य म्हणजे शालेय प्रशासन होय."

८. शैक्षणिक साहित्य

"० ते ६ वयोगटातील मुलांना खेळातून मिळणा-या शिक्षणासाठी वापरण्यात येणारी साधने.

## १.६ *संशोधनाची उद्दिष्टे*

संशोधकाने संशोधन करण्यापूर्वी संशोधनासाठी पुढीलप्रमाणे उद्दिष्टे निश्चत केली आहेत.

१) दक्षिण सोलापूर तालुक्यातील अंगणवाडीच्या व्यवस्थापन व प्रशासनाचा आभ्यास करणे.

२) अंगणवाडीमधील उपलब्ध शैक्षणिक साहित्याचा व त्या साहित्याच्या वापरासंबधीचा वापर करणे.

३) अंगणवाडी मधील ० ते ६ वयोगटातील बालकांवरील संस्कार, आहार पोषण व आरोग्याविषयी सुविधांचा आभ्यास करणे.

४) या वयोगटातील बालकांचा मानसिक शारीरीक व सामाजिक विकास या संदर्भात आभ्यास करणे.

५) बालरोग व कुपोषण यांचा शिक्षणावर होणा-या परीणामाचा आभ्यास करणे.

६) एकात्किम बालविकास प्रकल्पामधील कार्य करणा-या सेवकांच्या समस्यांचा आभ्यास करणे.

७) एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत अंगणवाडयांच्या समस्यासंदर्भात उपाययोजना सुचविणे.

## १.७ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

> समस्यांची व्याप्ती :-

संशोधन कोणत्या भौगोलिक विभागाशी संबधीत आहे त्यातील कोणत्या लोकांशी संबधीत आहे. त्याचा कोणत्या घटकाशी संबधीत आहे व कोणत्या कालखंडाशी संबधीत आहे. याची माहिती देणे आणि या संशोधनाचे निष्कर्ष कोणाला लागू पडतील याचे कथन करणे म्हणजे संशोधनाची व्याप्ती स्पष्ट करणे होय.

अल्पशा पाहणीचे निष्कर्ष सार्वत्रिक स्वरूपात ठामपणे उपयोगात आणणे कितपत योग्य ठरेल अशी शंका उपस्थित होणे स्वाभाविक आहे. परंतु विद्यार्थ्यांच्या समस्या सर्वसाधारणपणे सारख्याच असतात शिवाय सर्व जाती जमाती विविध धर्म पंथ वंशाचे तसेच विभिन्न शाखेचे तसेच भौगोलिक दृष्ट्या भिन्न असणा-या विद्यार्थ्यांचा आभ्यास करून निष्कर्ष लागू करणे अयोग्य होणार नाही अशी कल्पना मनात ठेवूनच ही पाहणी करता आली आहे.

१) दक्षिण सोलापूर तालुक्यामध्ये एकूण मराठी माध्यामच्या १८१ अंगणवाडया शाळा आहेत या सर्व शाळेंचा समावेश सदर संशोधनामध्ये करण्यात आलेला आहे.

२) अंगणवाडी मराठी माध्यमाचे एकूण १८१ शाळांमधील १८१ शिक्षिकांचा समावेश सदर संशोधनामध्ये करण्यात आलेला आहे.

३) सदर संशोधनामध्ये अनुदानीत अंगणवाडी शाळांमधील शिक्षकांचीही यात समावेश करण्यात आलेला आहे.

४) फक्त स्त्री शिक्षिकेंचाच विचार सदर संशोधनामध्ये समाविष्ट केलेला आहे.

५) १ वर्ष अनुभवापासून ते १५ वर्षापेक्षा जास्त अध्यापनाचा अनुभव असलेल्या सर्व शिक्षिकेंचा संशोधनामध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

६) या संशोधनामध्ये अंगणवाडी शिक्षिकेंचे काम व कामाचे स्वरूप, वेतन, सेवाशाश्वती, बढतीच्या संधी इत्यादी घटकांचा विचार करण्यात आलेला आहे.

७) शिक्षिकांची परीणामकारकता तपासताणा त्यांच्याजवळ असलेले शैक्षणिक कौशल्य आपल्या कामाबद्दलच्या चांगल्या सवई व्यवसायासंबधी आवश्यक दृष्टीकोन, वैयक्तिक निर्णयक्षमता व समायोजनशिलता, विद्यार्थ्यांविषयी निर्णय घेण्याची क्षमता व मुल्यनिर्णय इत्यादी बाबींचा विचार करण्यात आलेला आहे.

> **संशोधनाची मर्यादा :-**

संशोधनातील या घटकावर संशोधकाचे नियंत्रण नसते तथापी ते घटक निष्कर्षावर मर्यादा घालतात अशा घटकांची माहिती देणे म्हणजे संशोधनाची मर्यादा स्पष्ट करणे होत. सदर संशोधनाच्या खालील मर्यादा आहेत.

१) दक्षिण सोलपूर तालुक्यामध्ये मराठी माध्यमाच्या शाळांव्यतिरिक्त तेलगु, कन्नड, इंग्रजी, हिंदी, उर्दु या माध्यामांच्या शाळांचा विचार या संशोधनामध्ये करण्यात आलेला नाही.

२) अनुदानित शाळांच्या व्यतिरिक्त तांत्रिक शाळा, मुकबधीरांच्या शाळा, आश्रमशाळा, या शाळांचा समावेश या संशोधनामध्ये करण्यात आलेला नाही.

३) शाळेतील मुख्याध्यापक शिक्षिकांच्या व्यतिरिक्त इतर सेवकांचा संशोधनामध्ये समावेश करणेत आलेला नाही.

४) अंगणवाडी शिक्षिकांचे वैयक्तिक जीवन, भाषा, जात या गोष्टींचा विचार सदर संशोधनामध्ये करण्यात आलेला नाही.

५) शिक्षिकांच्या परिणामकारकतेशी संबधीत शाळेच्या भौतिक सुविधा विद्यार्थ्यांमधील व्यक्तीभिन्नतेच्या सदर संशोधनामध्ये विचार करणेत आलेला नाही.

## १.८ दक्षिण सोलापूर तालुक्यातील माहिती

### १) भौगोलिक स्थान :-

तालुका दक्षिण सोलापूर हा जिल्हा सोलापूरातील अकरा तालुक्यापैकी एक तालुका आहे. भौगोलिक स्थान १७.१० ते १८.३२ उत्तर अक्षांश व ७४.४२ ते ७६.१५ पूर्व रेखांश यांच्या दरम्यान आहे. तालुक्याच्या उत्तरेस शहर सोलापूर व उत्तर सोलापूर तालुका आहे. पूर्वेस अक्कलकोट तालुका आहे. पूर्व व दक्षिणेस कर्नाटक राज्य आहे. पश्चिमेस मंगळवेढा तालुका आहे.

### २) क्षेत्रफळ :-

दक्षिण सोलापूर तालुक्याची एकूण भौगोलिक स्थान व क्षेत्रफळ १८४३ चौ.कि.मी. असून ते महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील एक तालुका

आहे. ११ तालुक्यापैकी क्षेत्रफळाच्या दृष्टीने करमाळा तहसील सर्वात मोठा आहे. उत्तर सोलापूर तहसील क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात लहान आहे.

३) प्राकृतीक रचना :-

तालुक्याचे मुख्यालय सोलापूर हे ठिकाण समुद्र सपाटीपासून ५५० मीटर उंचीवर आहे. तालुक्यातील ठिकाणी महत्वाचे पर्वत नाहीत परंतु बालाघाट पर्वत श्रेणीचे कित्येक फाटे इतर तहसीलाच्या उत्तरेस कांही मैल पसरलेले आहेत. त्याप्रमाणे दक्षिण सोलापूर तालुक्याच्या पश्चिमेस विखरलेले डोंगर आहेत.

४) लोकसंख्या :-

सन २००० - २००१ च्या जनगणनेनुसार दक्षिण सोलापूर तालुक्याची एकूण लोकसंख्या १,८७,१७५ असून त्यापैकी ९७,००७ पुरुष व ९०,१५० स्त्रीया आहेत. सन १९७१ च्या जनगणनेशी तुलना करीता दरवर्षी वाढीचे प्रमाण हे जिल्ह्यातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेला तालुका माळशिरस आहे. या तालुक्याची लोकसंख्या ३,५०,३४६ इतकी आहे. सर्वात कमी लोकसंख्या असलेला तालुका म्हणजे मंगळवेढा तालुका होय. मंगळवेढा तालुक्याची लोकसंख्या १,२९,२३५ इतकी आहे. सोलापूर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २३,०१,५७४ इतकी आहे.

५) लोखकसंख्या घनता :-

सोलापूर जिल्ह्याची एकूण क्षेत्रफळाशी तुलना करता या जिल्ह्याचे क्षेत्रफळाचे प्रमाण व लोकसंख्येचे प्रमाण हे जास्त आहे. तालुक्यातील सर्वात जास्त लोकसंख्येची घनता उत्तर सोलापूर तालुक्यामध्ये आहे तर सर्वात कमी लोकसंख्येची घनता मंगवेढा तालुक्यात आहे.

६) स्त्री - पुरुष प्रमाण :-

सन २००० व २००१ च्या जनगणनेनुसार दक्षिण सोलापूर तालुक्याचे दर १००० पुरुषामागे स्त्रीयांचे प्रमाण ९४६ इतके आहे. राज्याचे दर हाजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण ९३७ आहे.

७) साक्षरता :-

दक्षिण सोलापूर तालुक्यात एकूण लोकसंख्येच्या ३४.८२ टक्के साक्षर लोक आहेत. एकूण लोकसंख्येच्या साक्षरतेचे प्रमाण स्त्रीयांपेक्षा पुरुषांचे साक्षरतेचे प्रमाण अधिक आहे.

८) शैक्षणिक परिस्थिती :-

दक्षिण सोलापूर तालुक्यात शिक्षणाची प्रगती म्हणावी तशी झालेली नाही. दक्षिण सोलापूर तालुक्यात १८१ अंगणवाडी शाळा आहेत. हे प्रमाण फार नाही. दक्षिण सोलापूर तालुक्याची एकूण लोकसंख्या १,८७,१५७ आहे. या लोकसंख्येच्या मानाने १८१ अंगणवाडी शाळा फार नाहीत. या तालुक्यात शैक्षणिक परिस्थिती फार मागास आहे. त्यासाठी शासनाने अधिक शाळा काढून शैक्षणिक प्रगती केली पाहीजे.